अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना नवीन अभियांत्रिकी पदवी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी परवानगी देण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. टीईएम २००६/(३८७/०६)/तांशि-१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २३ नोव्हेंबर २००६

S.P.H. College of Pharmacy
Inward No. 113 A/06-07
Date: 28/11/06

संदर्भ :- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिरषद, नवी दिल्ली यांची दि.२०.७.२००६,२७.७.२००६ ची पत्र.

**शासन निर्णय** :- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधिन पत्रान्वये सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षासाठी अटी व शर्तींच्या अधीन राहून खालील संस्थांना नवीन अभियांत्रिकी पदवी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाची संस्था सुरु करण्यासाठी परवानगी दिली आहे. त्यास अनुसरुन शासन आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. रिट याचिका क्र.३९१६/२००१, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली विरुध्द महाराष्ट्र शासन या याचिके संदर्भात दि.१७.९.२००१ रोजी देण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने दि.३० जून, २००६ नंतर अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून मान्यता प्राप्त प्रस्तावांना पुढील शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता देण्यात येते. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून पुढील संस्थांना दि.२०.७.२००६ व दि.२७.७.२००६ रोजी मान्यता दिली आहे. तथापि, सदर संस्थांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई व नागपूर येथे दाखल केलेल्या याचिका अनुक्रमे क्र. ४१३३/२००६ व १८८५/२००६ मध्ये दि.११.८.२००६ रोजी दिलेल्या निर्णयानुसार सदर संस्थाना या शैक्षणिक वर्षापासून ( सन २००६-०७) अभियांत्रिकी पदवी व औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाची संस्था सुरू करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | महाविद्यालयाचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १. | मराठवाडा मित्र मंडळाचे कॉलेज ऑफ इंजि. सर्व्हे नं.१८, प्लॉट नं. ५/३, सीटीएस नं. २०५, कर्वेनगर, पुणे | कॉम्प्यु. इंजि.<br>इलेक्ट्रानिक्स ॲण्ड टेलि. कम्यु. इंजि.<br>इन्फॉरमेशन टेक्नॉ.<br>मेकॅ. इंजिनिअरींग | ६०<br>६०<br>६०<br>६० |
| २. | महात्मा गांधी विद्यामंदीरचे समाजशिल प्रशांत दादा हिरे कॉलेज ऑफ फार्मसी, लोकनेते व्यंकटरावजी हिरे मार्ग, मालेगांव कॅम्प, नाशिक ४२३ १०५ | बी.फार्मसी | ६० |
| ३. | नाशिक ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळाचे कॉलेज ऑफ फार्मसी, गट क्र.५९, अंजेरी, नाशिक | बी.फार्मसी | ६० |

कृपया मागे पहा.

३. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची सदर मान्यता विचारात घेऊन सदर खाजगी संस्थांना सन २००६-०७ करिता कायम विनाअनुदान तत्वावर वरीलप्रमाणे नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्यासाठी परवानगी देण्यात येत आहे.

४. सदर मान्यता ही खालील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दि. २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटीची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्राची आणि औपचारिक बाबींची पूर्तता तंत्रशिक्षण संचालकाच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमासाठीच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता / संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांने / संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट १९४८ च्या कलम १२ मधील तरतूदीनुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहिल.

६) सदर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार / पध्दतीनुसार करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( स्मिता द. निवतकर )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२) मा. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
३) मा. कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ सोलापूर
४) संबंधित संस्थांना (संचालक (तंत्र शिक्षण) यांचे मार्फत.)
५) मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
६) मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
७) निवड नस्ती (तांशि-१)

प्रत –

७) सल्लागार (यू.जी.) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११० ००२.
८) विभागीय अधिकारी, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रीयल इनशुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०,
ई-मेल - desk10@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक: १०/एनजीपी/मान्यता/डी. फार्मसी/२०२२/ ५८ दिनांक : 24 JAN 2023

S.P.H. College of Pharmacy
Inward No. 416
Date : 28/03/2023.

प्रति,
प्राचार्य,
महात्मा गांधी विद्यामंदीरचे,
समाजश्री प्रशांतदादा हिरे कॉलेज ऑफ फार्मसी,
लोकनेते व्यंकटराव हिरे मार्ग, मालेगाव-कॅम्प,
मालेगाव, जि. नाशिक-४२३१०५.

[5205]

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून राज्यातील विद्यमान औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थेत कायम विनाअनुदानित तत्वावर नवीन औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देणेबाबत.**

**संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक : मान्यता-२०२२/(प्र.क्र.७९/२२)तांशि-५, दिनांक : २०.१०.२०२२.**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयान्वये, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून आपल्या विद्यमान औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थेत कायम विनाअनुदानित तत्वावर नवीन औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम खालील तक्त्यात दर्शविलेल्या प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून शासन मान्यता दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | अभ्यासक्रमाचा स्तर | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १. | डीप्लोमा इन फार्मसी | पदविका | ६० |

आपल्या संस्थेने शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व इतर अटी यांचे पालन करण्याबाबत नोंदणीकृत हमीपत्र प्रपत्र "अ" व "ब" या संचालनालयास सादर केलेले आहे. आपल्या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून कायम विनाअनुदान तत्वावर विद्यमान औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेमध्ये नवीन औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम सुरु करण्याच्या अनुषंगाने मुदतठेव म्हणून रु. ३.०० लाख, खाते क्र. ९७५८०३०००१५०४४, दिनांक : ९.११.२०२२ अन्वये, बँक ऑफ बडौदा, शाखा आडगाव नाका, पंचवटी, येथे संस्था व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी ठेवलेले आहेत.

संदर्भांकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्तीसह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून आपल्या विद्यमान औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थेत नवीन औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेस कायम

विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास, विद्यार्थ्यांना विहित पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया/ महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ तसेच शासनाच्या मानकांप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या संकेत क्रमांक व पासवर्डव्दारे शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था व संचालनालयाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी अद्ययावत करतील.

३. संस्थेने प्रवेशासाठी औषधनिर्माणशास्त्र पदविका [D. Pharmacy] अभ्यासक्रमाची तंत्रशिक्षण संचालनालय यांचेकडे नोंदणी व तदअनुषंगिक कार्यवाही करणे आवश्यक राहील.

४. शासनाने, या संचालनालयाने, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार शासनास/ फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया यांना राहतील.

उपरोक्त सर्व अटी व शर्ती, शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती व वेळोवेळी शासन / संचालनालय यांनी निर्गमित केलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या अनुषंगाने माहितीसाठी सादर.

प्रत: माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेशित :

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक.
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
३. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, औरंगाबाद.
४. कार्यासन क्रमांक ३, (आयटी सेल), मुख्य कार्यालय, मुंबई.
५. निवड नस्ती.

Noted.